OFFICE OF THE COLLECTOR NANDED.

# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

क्र. 2020-/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/सीआर-
दिनांक :- २७ मार्च, २०२०.

प्रति,
कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक,
१) भाऊराव चव्हाण ससाकाम., देगाव, ता. अर्धापूर, जि. नांदेड. (युनिट १)
२) भाऊराव चव्हाण ससाकाम., हडसणी, ता. हदगाव, जि. नांदेड. (युनिट ४)
३) मे. कुंटूरकर शुगर्स लि., नायगाव, जि. नांदेड.
४) मे. व्यंकटेश्वरा अॅग्रो शुगर प्रॉडक्टस् प्रा. लि., शिवणी, ता. लोहा, जि. नांदेड.

विषय : राज्यात कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाय योजनाबाबत करण्याबाबत...

संदर्भ : मा. संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, पुणे यांचे स्वाक्षरीने पाठविण्यात आलेले मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे ई-मेल पत्र जा. क्र. साआ/प्रशासन-२/कोरोना/उपाययोजना/२०२०, दि. २७/०३/२०२०.

वरील विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्राने करोना विषाणुच्या (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाय योजनाबाबत करण्याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे उद्धृत करण्यात येत आहेत :-

संपूर्ण देशामध्ये कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) फैलाव मोठ्या प्रमाणावर होत आहे. देशामध्ये कोरोनाचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी औषध उपचाराबरोबर इतर प्रतिबंधात्मक उपाय योजले जात आहेत. अशा परिस्थितीमध्ये राज्य शासनसुद्धा कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपायोजना करीत आहे. साखर ही जीवनावश्यक वस्तुमध्ये *(Essential Commodities Act, 1955)* मोडत असून राज्यातील साखर कारखान्यांसाठी आवश्यक असणारा कच्चा माल पुरविण्यासाठी वाहनांची आंतरराज्यीय व राज्यांतर्गत वाहतूक करण्यासाठी अडथळा होऊ नये याबाबत केंद्र शासनाने दि. २६/०३/२०२० च्या पत्राने सर्व राज्यांना सूचना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे साखर कारखाने सुरू ठेवण्यासाठी आवश्यक ऊस तोडणी मजुरांना व त्यांच्या वाहनांना ये-जा करण्यासाठी अडथळा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

राज्यातील सन २०१९-२० चा ऊस गाळप हंगाम सद्यस्थितीत अंतिम टप्प्यात असून काही कारखान्यांचे गाळप सुरू आहे. विशेषत: कोल्हापूर, सांगली, सातारा व पुणे जिल्ह्यातील काही सहकारी तसेच खाजगी साखर कारखाने अद्यापि सुरू आहेत. यातील काही कारखान्यांचे गाळप मार्च अखेर, एप्रिल अखेर, क्वचित प्रसंगी मे महिन्यामध्ये जाण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत कारखान्याकडे ऊसतोड मजूर ऊस तोडणी करीत असले



Scanned by CamScanner

तरी कोरोना विषाणुच्या पार्श्वभुमीवर त्यांच्या आरोग्याची तसेच भोजन व निवासाची व सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :

अ) ज्या कारखान्यांचे गाळप संपलेले आहे त्या कारखान्यातील ऊसतोड मजुरांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था कारखान्याने करावी. तसेच त्यांच्या आरोग्यविषयक सुविधेची (हॅन्ड सॅनिटायझरचा वापर, सुरक्षित अंतर ठेवणे, पाणी व्यवस्था करणे, इ.) व सुरक्षिततेची काळजी घ्यावी.

आ) जे कारखाने अद्यापि सुरू आहेत, त्या कारखान्यांनी ऊसतोड मजुरांच्या राहण्याची व भोजनाची तसेच सुरक्षिततेची व कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्यविषयक सर्व प्रकारची काळजी घ्यावी.

कारखान्यांनी वरील सूचनांची अंमलबजावणी सत्वर व योग्य रीतीने होईल याची दक्षता घ्यावी.

(डॉ. विपीन इटनकर, भाप्रसे)
**जिल्हाधिकारी, नांदेड**
**तथा**
**अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.**

प्रत :

१) मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) पोलिस अधिक्षक, नांदेड यांना माहितीकरिता.
४) प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांना माहितीकरिता.
५) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांना माहितीस्तव.



Scanned by CamScanner